ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख २० मार्च, १९६३ | अंक ६

## विविध माहिती

**दिल्ली शहराचा वीजपुरवठा**—दिल्ली शहराला करण्यांत येणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत वाढ करण्यासाठी हिंद आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें अमेरिका हिंदला विजेच्या वाढीच्या योजनेसाठी १·६० कोटी डॉलर्स अथवा ७·६ कोटी रुपये कर्ज देणार आहे. योजना अंमलांत आल्यावर दिल्लीच्या वीजपुरवठ्यांत १ लक्ष, ८० हजार किलोवॅटसची भर पडेल.

**अमेरिकेंतील मोटारअपघात**—१९६२ सालीं अमेरिकेंतील रस्त्यांवर झालेल्या मोटारअपघातांत आतांपर्यंत सर्वांत जास्त म्हणजे ४१ हजार माणसें प्राणाला मुकलीं. ह्या सर्वांनीं आपल्या आयुष्याचे विमे उतरलेले होते. परिणामीं, अमेरिकन आयुर्विमा कंपन्यांनीं अपघातांत मृत्यु पावलेल्यांच्या कुटुंबियांना १६·८ कोटी डॉलर्स रक्कम हक्कपूर्तीदाखल दिली.

**हिंदी बनावटीचीं घड्याळें**—हिंदुस्थान मशीन टूल्स लि. ह्या कारखान्यांत बनविण्यांत येणारीं घड्याळें दोषरहित असतात. सदोष घड्याळें कंपनी बाजारांत पाठवीत नाहीं. कंपनीनें बनविलेलीं ३६,००० घड्याळें बाजारांत विकण्यांत आलीं होतीं. त्यांपैकीं ४·२ टक्के घड्याळेंच कारखान्याकडे सदोष म्हणून परत आलीं; आणि तींहि वापरणारांच्या गैरवापरामुळें.

**पोलादाच्या आयातींत वाढ**—भारतामधील आणीबाणीच्या परिस्थितीमुळें पुढील वर्षी पोलादाची आयात वाढण्याचा संभव आहे. पोलादाची मागणी ५८·९ लाख टन असेल असा अंदाज आहे. पण देशांतील पोलादाचें उत्पादन मात्र ४४·४ लाख टनांच्या आसपास असेल. भारतामधील सर्व पोलादकारखान्यांना आपली संपूर्ण उत्पादनक्षमता लवकरांत लवकर कारणीं लागण्याच्या सूचना देण्यांत आल्या आहेत.

**उत्तर प्रदेशांतील दुग्धव्यवसाय**—उत्तर प्रदेश सरकार आग्रा येथें लवकरच एका गौळवाड्याची स्थापना करणार आहे. त्याचप्रमाणें बरेली येथेंहि आणखी एक गौळवाडा उभारण्याचा विचार चालू आहे. राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या दूधपुरवठा योजनांसाठी ४ कोटी, ५० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**निष्कारण ठरलेला खर्च**—ब्रिटनमध्यें अमेरिकेच्या सहकार्यानें 'स्कायबोल्ट' अग्निबाणवाहक तयार करण्यांत येणार होता. परंतु गेल्या डिसेंबरमध्यें तो तयार करावयाचा नाहीं असें ठरविण्यांत आलें. त्यामुळें ह्या अस्त्रावर ब्रिटननें केलेला खर्च वाया गेला आहे. ब्रिटिश सरकारला ह्या कामीं १४ लाख पौंडांचा भुर्दंड सोसावा लागत आहे.

**५०,००० मोटार ड्रायव्हर्सना शिक्षण**—संरक्षणकार्यांत भाग घेण्यासाठी ५०,००० मोटार ड्रायव्हर्स शिकवून तयार करण्याची योजना मध्यवर्ती सरकारच्या मजूर व रोजगार खात्यानें तयार केली आहे. ह्यांपैकीं ५,००० ड्रायव्हर्सना उत्तरप्रदेशांत शिकविलें जाणार आहे. मीरत येथील प्रशिक्षण-केंद्रांत बिनतारी संदेशवाहनाचें काम करणारीं माणसेंहि शिकवून तयार करण्यांत येत आहेत.

**सुरत येथें पुस्तकांचें प्रदर्शन**—गुजरातच्या गव्हर्नरांनीं सुरत शहरांत पुस्तकांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले, कीं इंग्रजी भाषा ज्ञानाचें फार मोठें भांडार आहे. म्हणून इंग्रजींतील पुस्तकांचीं गुजराती भाषेंत भाषांतरें करण्यांत आलीं पाहिजेत. त्यामुळें गुजराती वाचकांच्या ज्ञानाचें क्षितिज आपोआपच पसरत जाईल. समाजाच्या प्रगतींत पुस्तकांना अजूनहि महत्त्वाचें स्थान आहे.

**१२ कॅरेट सोन्याचे दागिने**—रायपूरमधील एका प्रमुख सराफानें १२ कॅरेट सोन्याचे दागिने यशस्वी रीत्या बनविले आहेत. बनविलेल्या दागिन्यांत आंगठ्या, सांखळ्या व बांगड्या ह्यांचा समावेश आहे. ह्या दागिन्यांचा रंग फिकट पिवळा आहे. दागिने करण्यासाठी स्थानिक हिणकसाचा वापर करण्यांत आला.

**त्रिवेंद्रम् जवळील समुद्रकिनारा**—केरळमधील त्रिवेंद्रम शहराजवळ असलेला वालुकामय समुद्रकिनारा हौशी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी सुसज्ज करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी मध्यवर्ती सरकारनें एक योजनासमिति नेमली आहे.

**कोल्हापूरमध्यें खेळांचा आखाडा**—कोल्हापूर नगरपालिकेनें शहरांत खेळांसाठी एक आखाडा बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी ५ लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. आखाडा बांधण्याच्या कामास लवकरच सुरुवात होणार आहे. तो पूर्ण होण्यास ६ वर्षें लागतील असा अंदाज आहे.

**ब्रिटनमधील राष्ट्रीय संरक्षण-निधि**—भारताच्या संरक्षण-निधीसाठी २॥ लाख पौंड जमविण्याचें तेथील हिंदी लोकांनीं ठरविलें होतें. त्यांपैकीं २ लाख, २३ हजार पौंडांची रक्कम आतांपर्यंत जमविण्यांत आली आहे. उरलेली रक्कम लवकरच जमेल असा अंदाज आहे.

**जामनगरमधील बसवाहतूक**—जामनगर म्युनिसिपालिटीनें ह्या वर्षाच्या आक्टोबर महिन्यापासून शहरांतील बसेसची वाहतूक ताब्यांत घेण्याचें ठरविलें आहे. सध्यां वाहतुकीचें काम खाजगी कंपनीकडे आहे. वाहतूक ताब्यांत घेण्यासाठी नगरपालिकेनें १२ लाख, ५० हजार रुपयांची तरतूद केली आहे.

**पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणी**—मध्यप्रदेशांतील पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणींचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न जोरानें करण्यांत येत आहेत. खाणींत वापरण्यासाठी माती बाजूला सारणारी अवजड यंत्रसामग्री नुकतीच आली आहे. येत्या आक्टोबर मध्यें मातीमधून हिरे वेगळे काढणारी यंत्रसामग्री खाणींत बसविण्यांत येईल. आणि मग दररोज २० कॅरेट हिऱ्यांचें उत्पादन होऊं लागेल.


**घशाच्या विकाराचे बळी**—दूषित हवेमुळें आणि सिगारेटस् ओढण्यामुळें दरसाल २,५८८ स्कॉटिश माणसें मृत्युमुखीं पडतात असा हिशोब स्कॉटलंडमधील एका वैद्यकीय सल्लागार समितीनें केला आहे. औद्योगिक शहरांतील कारखाने आणि मोटारीमधून बाहेर पडणारे वायू ह्यांच्यामुळें हवा सारखी दूषित होत असते असें त्यांचें म्हणणें आहे.

**तिबेटी निर्वासितांची सोय**—ओरिसा राज्यांतील गंजम् जिल्ह्यांत तिबेटमधून आलेल्या २,५०० निर्वासितांची सोय लावण्यांत येणार आहे. त्यांच्या वसाहतीसाठी ३,४५२ एकर जमीन सरकारनें ताब्यांत घेतली आहे. वसाहती स्थापन करण्यासाठी सुमारें ३६ लाख रुपये खर्च करावे लागणार आहेत. पुनर्वसनाचें काम दोन टप्प्यांत पुरें करण्यांत येईल.

**सीलोनमध्यें खनिज तेल**—भारताच्या भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतानें उत्तर सीलोनमध्यें खनिज तेल सापडण्याचा संभव आहे. दक्षिण भारतांत तंजावर जिल्ह्यांत हिंदी तज्ज्ञांनीं केलेल्या पाहणींत अशा प्रकारचें तेलमिश्रित खडक आढळून आले. तसेच खडक सीलोनमध्यें मानारच्या जवळपासच्या भूगर्भात सांपडतील असा त्यांचा होरा आहे. सीलोनचें सरकार व परदेशीय तेलकंपन्या ह्यांचे संबंध सध्यां दुरावलेले आहेत.

**बेकार वैमानिकांची सोय**—व्यापारी कंपन्यांतून काम करण्याचा परवाना असलेले १३ वैमानिक आणि वैमानिकाच्या परीक्षेंत नुकतेच उत्तीर्ण झालेले १६ वैमानिक सध्यां बेकार आहेत. ह्या वैमानिकांना काम देण्याबाबत भारत सरकार विचार करीत आहे. भारताच्या वैमानिक दलांत अगर हवाई क्लबांत त्यांना काम देण्यांत येण्याचा संभव आहे.

**गुजरातला तेलाची रॉयल्टी**—१९६३-६४ सालीं गुजरात राज्याला तेलावरील रॉयल्टीपासून ३८ लाख रुपयांचें उत्पन्न होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. गुजरातमध्यें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यांत भांडवल गुंतविण्यासाठीं म्हणून राज्य सरकारच्या अंदाजपत्रकांत ३० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.


विद्युत पंपिंग सेटस्

१ ते १० हॉ. पॉ. बंदिस्त मोटरसह

आपले ऊंसाचे, हळदीचे अथवा गव्हाचे कोणतेही पीक असो, त्यासाठीं पाणी पुरवठा मात्र बिनचुक झाला पाहिजे. परंतु त्याबाबत काळजी करण्याचे कारण नाहीं. हे काम किर्लोस्कर पंपिंग सेटस् तत्परतेने पार पाडतात. किर्लोस्कर पंपिंग सेटसची रचना शास्त्रशुद्ध व मजबूत असल्याने ते वर्षानुवर्षे विनासायास काम देतात. हे सेटस् सरकारी तगाई योजनेखालीही मिळतात पंपाच्या योग्य निवडीसाठीं तांत्रिक सल्ला मोफत दिला जातो.

सविस्तर माहितीसाठी आमच्या नजिकच्या अधिकृत विक्रेत्याकडे अथवा आमच्याकडे लिहा

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड

किर्लोस्करवाडी, जि. सांगली

STUSA KM 1/61

**पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणी**—मध्यप्रदेशांतील पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणींचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न जोरानें करण्यांत येत आहेत. खाणींत वापरण्यासाठी माती बाजूला सारणारी अवजड यंत्रसामग्री नुकतीच आली आहे. येत्या आक्टोबर मध्यें मातीमधून हिरे वेगळे काढणारी यंत्रसामग्री खाणींत बसविण्यांत येईल. आणि मग दररोज २० कॅरेट हिऱ्यांचें उत्पादन होऊं लागेल.

**घशाच्या विकाराचे बळी**—दूषित हवेमुळें आणि सिगारेटस् ओढण्यामुळें दरसाल २,५८८ स्कॉटिश माणसें मृत्युमुखीं पडतात असा हिशोब स्कॉटलंडमधील एका वैद्यकीय सल्लागार समितीनें केला आहे. औद्योगिक शहरांतील कारखाने आणि मोटारीमधून बाहेर पडणारे वायू ह्यांच्यामुळें हवा सारखी दूषित होत असते असें त्यांचें म्हणणें आहे.

**तिबेटी निर्वासितांची सोय**—ओरिसा राज्यांतील गंजम् जिल्ह्यांत तिबेटमधून आलेल्या २,५०० निर्वासितांची सोय लावण्यांत येणार आहे. त्यांच्या वसाहतीसाठी ३,४५२ एकर जमीन सरकारनें ताब्यांत घेतली आहे. वसाहती स्थापन करण्यासाठी सुमारें २६ लाख रुपये खर्च करावे लागणार आहेत. पुनर्वसनाचें काम दोन टप्प्यांत पुरें करण्यांत येईल.

**सीलोनमध्यें खनिज तेल**—भारताच्या भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतानें उत्तर सीलोनमध्यें खनिज तेल सापडण्याचा संभव आहे. दक्षिण भारतांत तंजावर जिल्ह्यांत हिंदी तज्ज्ञांनीं केलेल्या पाहणींत अशा प्रकारचें तेलमिश्रित खडक आढळून आले. तसेच खडक सीलोनमध्यें मानारच्या जवळपासच्या भूगर्भांत सांपडतील असा त्यांचा होरा आहे. सीलोनचें सरकार व परदेशीय तेलकंपन्या ह्यांचे संबंध सध्यां दुरावलेले आहेत.

**बेकार वैमानिकांची सोय**—व्यापारी कंपन्यांतून काम करण्याचा परवाना असलेले १३ वैमानिक आणि वैमानिकाच्या परीक्षेंत नुकतेंच उत्तीर्ण झालेले १६ वैमानिक सध्यां बेकार आहेत. ह्या वैमानिकांना काम देण्याबाबत भारत सरकार विचार करीत आहे. भारताच्या वैमानिक दलांत अगर हवाई क्लबांत त्यांना काम देण्यांत येण्याचा संभव आहे.

**गुजरातला तेलाची रॉयल्टी**—१९६३-६४ सालीं गुजरात राज्याला तेलावरील रॉयल्टीपासून ३८ लाख रुपयांचें उत्पन्न होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. गुजरातमध्यें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यांत भांडवल गुंतविण्यासाठी म्हणून राज्य सरकारच्या अंदाजपत्रकांत ३० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.



विद्युत पंपिंग सेटस्

१ ते १० हॉ. पॉ.
बंदिस्त मोटरसह

आपले ऊंसाचे, हळदीचे अथवा गव्हाचे कोणतेही पीक असो, त्यासाठीं पाणी पुरवठा मात्र बिनचुक झाला पाहिजे. परंतु त्याबाबत काळजी करण्याचे कारण नाहीं. हे काम किर्लोस्कर पंपिंग सेटस् तत्परतेने पार पाडतात. किर्लोस्कर पंपिंग सेटस्ची रचना शास्त्रशुद्ध व मजबूत असल्याने ते वर्षानुवर्षे विनासायास काम देतात. हे सेटस् सरकारी तगाई योजनेखालीही मिळतात पंपाच्या योग्य निवडीसाठीं तांत्रिक सल्ला मोफत दिला जातो.

सविस्तर माहितीसाठीं आमच्या नजिकच्या अधिकृत विक्रेत्याकडे अथवा आमच्याकडे लिहा

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
किर्लोस्करवाडी. जि. सांगली

STUSA KM 1/63

# अर्थ

बुधवार, ता. २७ मार्च, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आशियांतील व अतिपूर्वेकडील देशांच्या विकासाचें चित्र

संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या आशिया व अतिपूर्व आर्थिक मंडळाची ९ वी बैठक मॅनिला येथें भरली होती. ह्या भागांतील अप्रगत देशांच्या विकासासंबंधीचा एक अहवाल संघटनेच्या कचेरीमार्फत तयार करण्यांत आला आहे. अहवालांत १९६२ सालापर्यंतच्या आर्थिक घडामोडींची दखल घेण्यांत आली आहे. अहवालांत ग्रथित करण्यांत आलेल्या माहितीवरून असें दिसून येत आहे कीं संबंधित भागांतील देशांत औद्योगिक उत्पादनाचा वेग बराच आहे. ह्या बाबतींत औद्योगिक उत्पादनवाढीची मागील परंपरा चालू आहे. उद्योगधंद्यांतील उत्पादन दरसाल ९ टक्क्यांनीं वाढत आहे. त्या मानानें शेतीच्या उत्पादनांतील वाढ फार कमी आहे. शेतीच्या उत्पादनाची वाढ ४ टक्के व्हावी असें ठरविण्यांत आलें होतें; पण प्रत्यक्षांत मात्र वाढ फक्त २·८ टक्केच झालेली नमूद करण्यांत आली आहे. इतर अप्रगत देशांच्या मानानें भारताची प्रगति मात्र उद्योगधंदे व शेती ह्या दोन्ही बाबतींत समाधानकारक आहे. पश्चिम युरोपांतील देशांशीं तुलना करतां आशियांतील देशांचें खरें उत्पन्न एकदशांशच आहे. शिवाय युरोपांतील देशांचें उत्पन्न ज्या गतीनें वाढत आहे, त्याच्या दोनतृतीयांश गतीनेंच आशियांतील देशांचें उत्पन्न वाढत आहे. १९७० पर्यंत आशियांतील अप्रगत देशांचें उत्पन्न दरसाल ५ टक्क्यांनीं तरी वाढेल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. हा अंदाज खरा ठरण्याची शक्यता दिसत आहे.

अहवालांतील माहितीप्रमाणें १९५६ सालापासून भारतानें आपलें अन्नधान्याचें उत्पादन २५ टक्क्यांनीं वाढविलें आहे. भारतामधील लोकसंख्येची वाढ लक्षांत घेतां दरडोई सरासरी अन्नधान्याची उत्पादनवाढ ९ टक्के आहे. हींच वाढ जपानमध्यें ८ टक्क्यांनीं झाली आहे; पाकिस्तानांत व आग्नेय आशियांतील इतर देशांत ६ टक्क्यांनीं झाली आहे. इंडोनेशियांत तर दरडोई अन्नधान्याच्या उत्पादनाचें प्रमाण ३ टक्क्यांनीं कमीच झालेलें आहे. भारतानें आपली स्वतःची औद्योगिक व अवजड कारखानदारी चालू केली आणि जपाननें आपली अर्थव्यवस्था बदलून अवजड उद्योगधंद्यांवर भर दिला. ह्या दोन्हीं कारणांमुळें आशिया व अतिपूर्वेकडील देशांचें लोखंडाचें उत्पादन तिपटीनें वाढलें आहे. तथापि प्रत्येक देशांतील एकूण उत्पादनांत औद्योगिक उत्पादनाची टक्केवारी वेगवेगळी आहे. भारताच्या एकूण उत्पादनांत औद्योगिक उत्पादन १५ टक्के आहे. फोर्मोसामधील औद्योगिक उत्पादनाचें प्रमाणहि १५ टक्केच आहे. जपानमध्यें मात्र औद्योगिक उत्पादनाचें प्रमाण ३० टक्के आहे. इतर देशांतील औद्योगिक उत्पादनाचें प्रमाण १० टक्क्यांच्या आसपास आहे. आशियांतील देशांच्या आयात-निर्यात व्यापारांतील तूट आवाक्याबाहेर गेल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे आणि युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांच्या धोरणामुळें हीं परिस्थिति अधिकच चिघळण्याची शक्यतां स्पष्ट करण्यांत आली आहे.

---

## पेनिसिलीनमधील सरकारची नफेबाजी

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या खर्चासाठी सरकारी कंपन्यांचे द्वारां ४५० कोटी रुपये उपलब्ध होतील, ही नियोजन मंडळाची अपेक्षा स्वप्न ठरणार आहे. जनतेचे सुमारें २२० कोटी रुपये गुंतलेल्या २८ कंपन्यांपैकी फक्त आठ कंपन्यांकडून १९६३–६४ मध्यें सरकारला डिव्हिडंड मिळेल अशी कल्पना आहे. त्यांत हिंदुस्थान अँटी बायोटिक्स ह्या कंपनीची गणना आहे. तिच्यांत सरकारी गुंतवणूक फक्त २·४७ कोटी रु. आहे, पण तिनें १९६१–६२ मध्यें ७७ लक्ष रु. नफा दिला आहे ! पेनिसिलीन आणि स्ट्रेप्टोमायसिन तयार करणाऱ्या कारखान्यानें गिऱ्हाइकांकडून घेतलेली किंमत उत्पादनखर्चाच्या अडीचपट आहे. औषधांच्या महागाईचे बाबतींत भारताचा अनुक्रम सबंद जगांत पहिला लागेल; दर माणशीं उत्पन्नाशीं त्याची तुलना अगदींच विषम होते. अशा परिस्थितींत जरूरीच्या औषधांचे बाबतींत इतका नफा मिळविणें गैर आहे, असें पब्लिक अकौंटस कमिटीनें आपलें मत नमूद केलें आहे.

## रिझर्व्ह बँकेनें कंपनीकर दिला पाहिजे

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मद्रास ही मद्रास सिटी म्युनिसिपल ॲक्टच्या ३० अ ह्या कलमाप्रमाणें कंपनी असून तिचेवर बसविलेला कंपनी कर कायदेशीर आहे, असें मद्रास हायकोर्टानें ठरविलें आहे. रिझर्व्ह बँकेवर वार्षिक १,००० रु. बसविलेला कंपनी कर कायद्याला धरून नाहीं, असा स्मॉल कॉजेस कोर्टानें निर्णय दिला होता. त्यावर मद्रास कार्पोरेशननें रिव्हिजन अर्ज केला होता. कायद्यानें अस्तित्वांत आणलेल्या स्टॅट्युटरी कार्पोरेशन्स ह्या कंपन्या नव्हेत असें ठरविलें तर सिटी म्युनिसिपल ॲक्टाच्या कक्षेंतून अशा कितीतरी कंपन्या गळतील, असें हायकोर्टानें नमूद केलें आहे.

---

## रेल्वेफाटक ओलांडतांना होणारे अपघात

रेल्वेमार्गावर असणारी रस्त्यावरील फाटकें ओलांडून जातांना अनेक वेळां अपघात होतात. ह्या अपघातासंबंधीं लोकसभेंत चर्चाहि झालेली आहे. ह्या फाटकाजवळ एक पहारेकरी ठेवावा व पहारेकऱ्यांच्यावर होणाऱ्या खर्चापैकीं निम्मा खर्च राज्य सरकारांनीं सोसावा, अशी सूचना मध्यवर्ती सरकारनें केली होती. परंतु मद्रास सरकार हा खर्च सोसण्यास तयार नाहीं. त्याऐवजीं रेल्वेफाटकाजवळ स्थानिक भाषेंतून मोठ्या अक्षरांत थांबण्याचा इशारा देण्याच्या पाट्या लावाव्या, ही सूचना राज्य सरकारनें मान्य केली आहे.

---

## इमर्जेन्सी विम्याचे दर कमी होणार

इमर्जेन्सी इन्शुअरन्सच्या हप्त्याचे दर शत्रूच्या स्वारीचा धोका कमी झालेला असल्यामुळें उतरविण्यांत येतील, असें अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत जाहीर केलें. धोका वाढल्यास हप्त्याचे दर वाढविले जातील, असेंहि त्यांनीं सांगितलें. हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न ३६ कोटी रु. होईल आणि संकटनिवारण झाल्यावर जमलेली रक्कम कन्सॉलिडेटेड फंडांत जमा केली जाईल.

# अर्थ

बुधवार, ता. २७ मार्च, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आशियांतील व अतिपूर्वेकडील देशांच्या विकासाचें चित्र

संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या आशिया व अतिपूर्व आर्थिक मंडळाची ९ वी बैठक मॅनिला येथें भरली होती. ह्या भागांतील अप्रगत देशांच्या विकासासंबंधीचा एक अहवाल संघटनेच्या कचेरीमार्फत तयार करण्यांत आला आहे. अहवालांत १९६२ सालापर्यंतच्या आर्थिक घडामोडींची दखल घेण्यांत आली आहे. अहवालांत ग्रथित करण्यांत आलेल्या माहितीवरून असें दिसून येत आहे कीं संबंधित भागांतील देशांत औद्योगिक उत्पादनाचा वेग बराच आहे. ह्या बाबतींत औद्योगिक उत्पादनवाढीची मागील परंपरा चालू आहे. उद्योगधंद्यांतील उत्पादन दरसाल ९ टक्क्यांनीं वाढत आहे. त्या मानानें शेतीच्या उत्पादनांतील वाढ फार कमी आहे. शेतीच्या उत्पादनाची वाढ ४ टक्के व्हावी असें ठरविण्यांत आलें होतें; पण प्रत्यक्षांत मात्र वाढ फक्त २·८ टकेच झालेली नमूद करण्यांत आली आहे. इतर अप्रगत देशांच्या मानानें भारताची प्रगति मात्र उद्योगधंदे व शेती ह्या दोन्ही बाबतींत समाधानकारक आहे. पश्चिम युरोपांतील देशांशीं तुलना करतां आशियांतील देशांचें खरें उत्पन्न एकदशांशच आहे. शिवाय युरोपांतील देशांचें उत्पन्न ज्या गतीनें वाढत आहे, त्याच्या दोनतृतीयांश गतीनेंच आशियांतील देशांचें उत्पन्न वाढत आहे. १९७० पर्यंत आशियांतील अप्रगत देशांचें उत्पन्न दरसाल ५ टक्क्यांनीं तरी वाढेल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. हा अंदाज खरा ठरण्याची शक्यता दिसत आहे.

अहवालांतील माहितीप्रमाणें १९५६ सालापासून भारतानें आपलें अन्नधान्याचें उत्पादन २५ टक्क्यांनीं वाढविलें आहे. भारतामधील लोकसंख्येची वाढ लक्षांत घेतां दरडोई सरासरी अन्नधान्याची उत्पादनवाढ ९ टक्के आहे. हींच वाढ जपानमध्यें ८ टक्क्यांनीं झाली आहे; पाकिस्तानांत व आग्नेय आशियांतील इतर देशांत ६ टक्क्यांनीं झाली आहे. इंडोनेशियांत तर दरडोई अन्नधान्याच्या उत्पादनाचें प्रमाण ३ टक्क्यांनीं कमीच झालेलें आहे. भारतानें आपली स्वत:ची औद्योगिक व अवजड कारखानदारी चालू केली आणि जपाननें आपली अर्थव्यवस्था बदलून अवजड उद्योगधंद्यांवर भर दिला. ह्या दोन्हीं कारणांमुळें आशिया व अति पूर्वेकडील देशांचें लोखंडाचें उत्पादन तिपटीनें वाढलें आहे. तथापि प्रत्येक देशांतील एकूण उत्पादनांत औद्योगिक उत्पादनाची टक्केवारी वेगवेगळी आहे. भारताच्या एकूण उत्पादनांत औद्योगिक उत्पादन १५ टक्के आहे. फोर्मोसामधील औद्योगिक उत्पादनाचें प्रमाणहि १५ टक्केच आहे. जपानमध्यें मात्र औद्योगिक उत्पादनाचें प्रमाण ३० टक्के आहे. इतर देशांतील औद्योगिक उत्पादनाचें प्रमाण १० टक्क्यांच्या आसपास आहे. आशियांतील देशांच्या आयात-निर्यात व्यापारांतील तूट आवाक्याबाहेर गेल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे आणि युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांच्या धोरणामुळें हीं परिस्थिति अधिकच चिघळण्याची शक्यता स्पष्ट करण्यांत आली आहे.

---

## पेनिसिलीनमधील सरकारची नफेबाजी

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या खर्चासाठी सरकारी कंपन्यांचे द्वारां ४५० कोटी रुपये उपलब्ध होतील, ही नियोजन मंडळाची अपेक्षा स्वप्न ठरणार आहे. जनतेचे सुमारें २२० कोटी रुपये गुंतलेल्या २८ कंपन्यांपैकी फक्त आठ कंपन्यांकडून १९६३-६४ मध्यें सरकारला डिव्हिडंड मिळेल अशी कल्पना आहे. त्यांत हिंदुस्थान अँटी बायोटिक्स ह्या कंपनीची गणना आहे. तिच्यांत सरकारी गुंतवणूक फक्त २·४७ कोटी रु. आहे, पण तिनें १९६१-६२ मध्यें ७७ लक्ष रु. नफा दिला आहे ! पेनिसिलीन आणि स्ट्रेप्टोमायसिन तयार करणाऱ्या कारखान्यानें गिऱ्हाइकांकडून घेतलेली किंमत उत्पादनखर्चाच्या अडीचपट आहे. औषधांच्या महागाईचे बाबतींत भारताचा अनुक्रम सबंद जगांत पहिला लागेल; दर माणशीं उत्पन्नाशीं त्याची तुलना अगदींच विषम होते. अशा परिस्थितींत जरूरीच्या औषधांचे बाबतींत इतका नफा मिळविणें गैर आहे, असें पब्लिक अकौंटस कमिटीनें आपलें मत नमूद केलें आहे.

---

## रिझर्व्ह बँकेनें कंपनीकर दिला पाहिजे

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मद्रास ही मद्रास सिटी म्युनिसिपल ॲक्टच्या ३० अ ह्या कलमाप्रमाणें कंपनी असून तिचेवर बसविलेला कंपनी कर कायदेशीर आहे, असें मद्रास हायकोर्टानें ठरविलें आहे. रिझर्व्ह बँकेवर वार्षिक १,००० रु. बसविलेला कंपनी कर कायद्याला धरून नाहीं, असा स्मॉल कॉजेस कोर्टानें निर्णय दिला होता. त्यावर मद्रास कार्पोरेशननें रिव्हिजन अर्ज केला होता. कायद्यानें अस्तित्वांत आणलेल्या स्टॅट्युटरी कार्पोरेशन्स ह्या कंपन्या नव्हेत असें ठरविलें तर सिटी म्युनिसिपल ॲक्टाच्या कक्षेंतून अशा कितीतरी कंपन्या गळतील, असें हायकोर्टानें नमूद केलें आहे.

---

## रेल्वेफाटक ओलांडतांना होणारे अपघात

रेल्वेमार्गावर असणारी रस्त्यावरील फाटकें ओलांडून जातांना अनेक वेळां अपघात होतात. ह्या अपघातासंबंधीं लोकसभेंत चर्चाहि झालेली आहे. ह्या फाटकाजवळ एक पहारेकरी ठेवावा व पहारेकऱ्यांच्यावर होणाऱ्या खर्चापैकी निम्मा खर्च राज्य सरकारांनीं सोसावा, अशी सूचना मध्यवर्ती सरकारनें केली होती. परंतु मद्रास सरकार हा खर्च सोसण्यास तयार नाहीं. त्याऐवजीं रेल्वेफाटकाजवळ स्थानिक भाषेंतून मोठ्या अक्षरांत थांबण्याचा इशारा देण्याच्या पाट्या लावाव्या, ही सूचना राज्य सरकारनें मान्य केली आहे.

---

## इमर्जन्सी विम्याचे दर कमी होणार

इमर्जन्सी इन्शुअरन्सच्या हप्त्याचे दर शत्रूच्या स्वारीचा धोका कमी झालेला असल्यामुळें उतरविण्यांत येतील, असें अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत जाहीर केलें. धोका वाढल्यास हप्त्याचे दर वाढविले जातील, असेंहि त्यांनीं सांगितलें. हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न ३६ कोटी रु. होईल आणि संकटनिवारण झाल्यावर जमलेली रक्कम कन्सॉलिडेटेड फंडांत जमा केली जाईल.

## खतांचे कारखाने ताब्यांत घेणार ?

मध्यवर्ती सरकारनें तुतिकोरीन, मंगलोर आणि दुर्गापूर ह्या ठिकाणीं रासायनिक खतांचे कारखाने काढण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं तुतिकोरीन व मंगलोर येथें काढावयाच्या कारखान्यां-संबंधींचे परवाने खाजगी कारखानदारांना देण्यांत आले असून तिसरा कारखाना पश्चिम बंगाल सरकार काढणार आहे. परंतु परवानेदारांनीं आपल्या कामाला अद्याप सुरुवात केलेली नाहीं. त्यांनीं कारखान्याच्या उभारणीच्या कामास लवकर प्रारंभ केला नाहीं तर हें काम मध्यवर्ती सरकार स्वतःच करून कारखाने स्वतःकडे घेण्याचा संभव आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत रासायनिक खतांच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ८ लाख टन ठरविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गांठण्यासाठीं कारखाने उभारून त्यांत उत्पादन त्वरित सुरू होणें आवश्यक आहे. कारखान्यांत निर्माण करण्यांत यावयाच्या खतांच्या किंमतीवर सरकारचें नियंत्रण परवाने दिलेल्या कारखानदारांना नको आहे. सरकारनें कांहीं रासायनिक खतांच्या किंमती ठरवून टाकल्या आहेत. हीं खतें सोडून इतर खतांच्या किंमतीवर तरी सरकारी नियंत्रणें ठेवण्यांत येऊं नयेत अशी मागणी करण्यांत येत आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील शेतकरी रासायनिक खतें अधिकाधिक प्रमाणांत वापरूं लागला आहे. त्यामुळें अमोनियम सल्फेटसारख्या खताला सुद्धां वाढती मागणी राहण्याचीं चिन्हें दिसत आहेत. त्याचा फायदा घेण्याचा कारखानदारांचा मानस आहे. परंतु सरकार किंमतीविषयीं कोठल्याहि प्रकारचें आश्वासन देण्यास तयार नाहीं. त्यामुळें कारखान्यांची उभारणी लांबली आहे.

## लहान बँकांच्या अधिकाऱ्यांचें मार्गदर्शन

लहान आकाराच्या बँकांच्या प्रमुख अधिकाऱ्यांचें एक सेमिनार मद्रास येथें भरविण्यांत आलें, त्याचें प्रास्तविक भाषण रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. पी. सी. भट्टाचार्य ह्यांनीं केलें. बँकांच्या तपासणीची व्यापक योजना रिझर्व्ह बँकेनें अमलांत आणली आहे, पण अंतर्गत कार्यक्षमता आणि सचोटी ह्यांची जागा ती घेऊं शकत नाहीं, असें ते म्हणाले. मुंबईच्या बँकर्स ट्रेनिंग कॉलेजांतून १,३०० बँक अधिकारी बाहेर पडले आहेत, परंतु लहान बँकांना ह्या कॉलेजचा पूर्णपणें फायदा घेणें शक्य होत नाहीं. लहान बँकांचे व्यवहार बँकिंगच्या एकूण व्यवहाराचे मानानें अत्यल्प असले, तरी देशाच्या आर्थिक विकासाला त्या महत्त्वाचा हातभार लावूं शकतात. कित्येक लहान बँकांना बँकिंग कंपन्यांच्या कायद्याखालील लायसेन्स देण्यांत आला आहे. डिपॉझिट इन्शुअरन्समुळें लहान बँकांना ठेवी मिळविणें अधिक सोपें जाईल. मद्रास विभागांत लहान बँकांची संख्या फार मोठी आहे म्हणून पहिलें सेमिनार मद्रास येथें भरविण्यांत आलें; इतर विभागांसाठीहि सेमिनार भरविण्याची कल्पना आहे. त्यांतील चर्चेचा आणि नव्या दृष्टिकोणाचा फायदा बँकांना मिळून बँकिंगच्या व्यवसायाला अधिक इष्ट वळण लागेल, अशी श्री. भट्टाचार्य ह्यांनीं आशा व्यक्त केली.

## हेरगिरीवर होणारा वाढता खर्च

ब्रिटिश सरकारचा हेरखात्यावरील खर्च वाढत चालला आहे. ३१ मार्च, १९६४ रोजीं संपणाऱ्या वर्षांत ह्या खात्यासाठीं ८० लाख पौंड खर्च येणार आहे. त्या खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. १९६३ सालीं ह्या खात्यासाठीं ७० लाख पौंडांची तरतूद करण्यांत आली होती. हें खातें पंतप्रधानाकडे असतें व त्याचा तपशीलवार खर्च कधींहि प्रसिद्ध करण्यांत येत नाहीं.

## चित्रपट व्यवसायासंबंधीं कांहीं आंकडे

आधुनिक जीवनांत चित्रपटांना करमणुकीचें व ज्ञानप्रसाराचें साधन म्हणून महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. ह्या साधनाचा उपयोग भारतांत करमणुकीसाठीच अधिक करण्यांत येतो, तरी त्यामुळें साधनाचें महत्त्व कमी होत नाहीं. भारतामधील निरनिराळया राज्यांतील चित्रगृहासंबंधींची व चित्रपटनिर्मितीची परिस्थिति कशी आहे तें पुढील आंकडेवार माहितीवरून लक्षांत येईल. चित्रगृहांच्या बाबतींत मद्रास राज्याचा क्रमांक पहिला लागतो. मद्रास राज्यांत कायमचीं व फिरतीं मिळून ९४३ चित्रगृहें आहेत. त्याखालोखाल आंध्र राज्यांत ६६८ चित्रगृहें आहेत. ह्या बाबतींत महाराष्ट्राचा क्रमांक तिसरा लागतो. महाराष्ट्रांत ६२८ चित्रगृहें आहेत. १९६१ मध्यें निरनिराळ्या भाषेंतील ३०३ चित्रपटांना चित्रगृहांत दाखविण्याचे परवाने देण्यांत आले होते. १९६२ सालीं ३२० चित्रपट मंजूर करण्यांत आले. १९६१ सालीं ४ चित्रपट नामंजूर करण्यांत आले होते. १९६२ सालीं फक्त एकच नामंजूर करण्यांत आला. हिंदी चित्रपटांची संख्या सर्वांत जास्त म्हणजे ९६ भरली. त्याखालोखाल तामीळ भाषेंत ६२ चित्रपट काढण्यांत आले. तेलगू भाषेंत ४८ चित्रपट काढण्यांत आले आसामी भाषेंत फक्त एक चित्रपट काढण्यांत आला. १९६२ सालीं २३४ परदेशी चित्रपटांना दाखविण्याची परवानगी देण्यांत आली. त्यांपैकीं ८५ चित्रपटांचा कांहीं भाग कापून त्यांना 'अ' दाखला देण्यांत आला. ३३ परदेशी चित्रपटांना दाखले नाकारण्यांत आले. भारतीय चित्रपटांपैकीं ४ चित्रपटांना कांहीं भाग कापून 'अ' दाखला देण्यांत आला. दोन चित्रपटांना काटछाट न करतां दाखले देण्यांत आले.

## बँकांच्या ठेवींचा विमा : पहिला क्लेम निर्माण झाला

युनिटि बँक लि., मद्रास हिचा लायसेन्स २० ऑगस्ट, १९६२ रोजीं रद्द करण्यांत आला. त्या बँकेनें आपल्या ठेवींचा डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनकडे विमा उतरलेला होता. विमा उतरलेल्या ठेवींपैकीं जेवढी रक्कम ठेवीदारांना बँक देऊं शकत नाहीं, तेवढीं डिपॉझिट कॉर्पोरेशननें द्यावयाची असते. असा प्रसंग युनिटि बँकेच्या बाबतींत आला आहे. बँकेच्या हिशेबांतील हातचलाखीमुळें, कॉर्पोरेशननें किती रकम दिली पाहिजे हें अद्याप निश्चित करतां आलेलें नाहीं. युनिटि बँकेचीं सर्व येणीं-देणीं स्टेट बँकेकडे वर्ग करण्यांत आलेलीं आहेत. स्टेट बँकेचा अभिप्राय अजून आलेला नाहीं. तथापि, कॉर्पोरेशननें अंदाजी नुकसान म्हणून ३,००,००० रु. ची तरतूद केली आहे. डिपॉझिट इन्शुअरन्स योजनेखालीं आतां भारतांतील ८०% ठेवीदार आणि २५% ठेवी आल्या आहेत. डिपॉझिट इन्शुअरन्स फंडाची रक्कम ९६ लक्ष रु. झाली आहे. हा फंड आणखी बराच वाढला, म्हणजे हप्त्याचा दर आणि विम्याची व्याप्ति ह्यांचा फेरविचार करतां येईल.

## आंध्र राज्यांत तांब्याच्या खाणी

आंध्र राज्यांतील गुंतूर जिल्ह्यांत हिंदी भूस्तर शास्त्रज्ञांना तांब्याचें खनिज सांपडलें आहे. खनिजाच्या तपासाचें काम १९५९ ते १९६१ ह्या दोन वर्षांत करण्यांत आलें. तांब्याचें खनिज असलेला मृत्तिकेचा सांठा विपुल असल्यानें येथील तांब्याच्या खाणी व्यापारी दृष्टीनें किफायतशीर ठरतील असें सांगण्यांत येत आहे.

## लिपझिग येथील व्यापारी प्रदर्शन

पूर्व जर्मनींतील लिपझिग ह्या शहरांत मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून एक मोठें व्यापारी प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत ६० परदेश भाग घेणार आहेत. भारताचा ह्या प्रदर्शनांतील मंडप सर्वांत मोठा आहे. भारतामधील ४९ कंपन्या आपआपला निर्यात माल प्रदर्शनांत मांडणार आहेत. त्याशिवाय निर्यात-वाढ मंडळातर्फे आणखी ९४ कंपन्यांचा माल प्रदर्शनांत ठेवण्यांत येणार आहे. चहा, मसाल्याचे पदार्थ. अभ्रक, काजू, कापड, इत्यादि नेहमींच्या मालाशिवाय प्रदर्शनांत एंजिनिअरिंगच्या धंद्यांतील मालहि मांडण्यांत येणार आहे. भारतांत तयार झालेला एंजिनिअरिंगचा माल पूर्व-जर्मनींत विकला जाण्याची शक्यता आहे.

## भारत-रुमेनिया ह्यांच्यामधील व्यापार

१९६२ सालीं भारत व रुमेनिआ ह्यांच्या दरम्यान १० कोटी रुपयांची व्यापारी देवघेव झाली. गेल्या नोव्हेंबरमध्यें उभयतां देशांमधील व्यापारी कराराची मुदत ५ वर्षांनीं वाढविण्यांत आली. ह्या अवधींत परस्परांतील व्यापार दरसाल १३ कोटी रुपयांच्या घरांत जाईल असा अंदाज आहे. भारत रुमेनियाकडून तेल, रसायनें, खाणी व सिमेंट ह्यांच्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री आयात करतो. सिंधेरानी येथील कोळशाच्या खाणीजवळ वीज उत्पन्न करण्याचा एक सबंध कारखानाच रुमेनिआच्या साह्यानें उभारण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी १ कोटी रुपये खर्च येणार असून त्यासंबंधीच्या करारावर अलीकडेच सह्या करण्यांत आल्या आहेत.

## गोमांस वर्ज्य मानण्याचें कारण !

हिंदुस्थानांत हिंदु लोक गोमांस खाण्यास वर्ज्य मानतात, मुसलमान लोक डुकराचें मांस निषिद्ध मानतात, तर स्वीडनमध्यें घोड्याचें मांस अखाद्य मानतात. स्टॉकहोम येथील सरकारी पशुवैद्यकाच्या कॉलेजचे प्रमुख मि. नील्स लँगरहॉफ ह्यांनीं ह्या बाबतींत एक उपपत्ति लावली आहे. त्यांच्या मतानें प्राचीन काळीं केव्हांतरी ह्या पशूंना रोग झाला असावा व त्यामुळें त्यांचें मांस खाण्यास योग्य राहिलें नसावें. मनुष्याच्या जीवितास अपायकारक अशा प्रकारच्या मांसाशनापासून निवृत्त करण्यासाठी वरील निषेध चालू करण्यांत आले असावे. भारतामधील गुरांची संख्या जगांतील सर्वांत अधिक असली तरी त्यामधील ३० टक्के गुरें पूर्णपणें निरुपयोगी आहेत, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

## मार्मगोवा बंदरांत नाविक तळ

गोव्यांतील मार्मगोवा बंदराचा विकास करून तेथें नाविक तळ स्थापन करण्याच्या भारताच्या संरक्षणखात्याच्या योजनेचा विचार चालू आहे. संरक्षणखातें, वाहतूक व दळणवळणखातें आणि परराष्ट्रीय खातें ह्यांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी पाठविण्यांत आलें होतें. मंडळानें आपला अहवाल सरकारला सादर केला आहे. ह्यासंबंधीचा निर्णय लवकरच घेतला जाण्याची शक्यता आहे. वहातूकखात्याच्या मतानें मार्मगोवा बंदराचा विकास व्यापारी बंदर म्हणून करण्यांत यावा तर संरक्षणखात्याच्या मतानें तो भारतीय नाविकदलाचा तळ म्हणून करण्यांत यावा.


# दि सरदार
# कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

**कारबोनिक ॲसिड गॅस**

**सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी**

**आणि**

**खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते**

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्‌चें ऑफिस

सर विठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कोनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६११२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. ८
३ दिल्ली-रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता-१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७-२२४७
५ विजयवाडा-गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी-डलहाऊसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '

## हवाई दळणवळणांत चीनचा अडथळा

गेल्या तीन तारखेपासून मॉस्को ते दिल्ली विमानमार्गावर रशिया टी. यू. ११४ हें प्रचंड विमान वापरण्यास प्रारंभ करणार होता. ह्या विमानाचा प्रवास अर्थातच चीनच्या प्रदेशावरून होणार होता. परंतु चीनच्या सरकारनें ह्या दळणवळणाला आक्षेप घेतला आहे. चीनच्या मतानें हें दळणवळण सुरू करण्यापूर्वी रशियन सरकारनें चिनी सरकारला आगाऊ कळवून त्याची संमति घेणें जरूर होतें. चिनी सरकारची मंजुरी घेऊन लवकरच नव्या विमानाचें दळणवळण सुरू होईल असा अंदाज आहे. सध्यां ज्या प्रदेशाबद्दल भारत व चीन ह्यांच्यांत तंटा आहे त्या प्रदेशावरूनहि रशियन विमानें उड्डाण करीत असतात. तेव्हां रशियन सरकारनें ह्या प्रदेशापुरती कोणाची परवानगी घ्यावयाची हा प्रश्नच आहे. टी. यू. ११४ विमान हें प्रवासी वाहतूक करणारें जगांतील सर्वांत मोठें विमान आहे असें म्हणतात. ह्या विमानांत १७० प्रवाश्यांची सोय आहे. एअर इंडियाचा दिल्ली–मॉस्को विमानमार्ग पाकिस्तान व अफगाणिस्थान ह्या देशांच्या प्रदेशावरून जातो.

---

## अमेरिकेकडून मिळणारी मदत

गेल्या वर्षीं युरोपमध्यें ज्या घडामोडी झाल्या त्यामुळें अमेरिकेकडून परदेशांना मिळणाऱ्या मदतीला अमेरिकन कॉंग्रेसकडून अधिक जोराचा विरोध होईल, असा अंदाज निरीक्षक करीत आहेत. प्रे. केनेडी ह्यांनी गेल्या वर्षीं मदतीसाठी जितकी रक्कम मागितली होती, तींत अमेरिकन कॉंग्रेसनें जवळजवळ १०० कोटी डॉलर्सची कपात केली होती. प्रे. केनेडी ह्याहि वर्षीं ४९० कोटी डॉलर्सची मागणी परदेशांना मदत देण्यासाठी करतील अशी वार्ता आहे.

## संयुक्त-राष्ट्र-संघटनेंतील मतमोजणी

संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या जनरल असेंब्लींत वेळोवेळीं होणाऱ्या मतमोजणीच्या पद्धतींत बदल होण्याचा संभव आहे. आतांपर्यंत सभासदांना आपलें मत 'होय', 'नाहीं' अगर 'मत दिलें नाहीं' असें तोंडानें सांगावें लागे अनुकूल अगर प्रतिकूल मत दाखविण्यासाठी हात वर करण्याची पद्धतीहि चालूं आहे. परंतु आतां प्रत्येक सभासदाच्या बाकाजवळ विजेचीं बटन्स ठेवण्यांत यावयाचीं आहेत. सभागृहांतील एका बोर्डावर होकार, नकार दर्शविणारे निरनिराळ्या रंगांचे दिवे बसविलेले असतील. विजेच्या बटन्सचा उपयोग करून सभासदांनीं मत व्यक्त करावयाचें आहे. मतमोजणीच्या ह्या पद्धतीवर सध्यां विचार चालूं आहे.

---

## नेपाळ रशिआकडून तेल घेणार

भारतामधील आणीबाणीच्या परिस्थितीमुळें नेपाळमध्यें भारताकडून आयात करण्यांत येणारें रॉकेल आणि पेट्रोल मिळेनासें झालें आहे. त्यामुळें नेपाळमध्यें खनिज तेलाचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी नेपाळ रशिआकडून तेलाची आयात करण्याची व्यवस्था करीत आहे. आयात तेलाचे वांटप करण्यासाठी लागणारी साधनसामग्रीहि नेपाळ रशिआकडूनच घेणार आहे. चीनकडून तेल घेणें नेपाळला अधिक सोईचें आहे. पण खुद्द चीनलाच तेल परदेशांतून आयात करावें लागतें. भारतावर चीननें केलेल्या आक्रमणानंतर चीननें तेलाच्या वापरावर कडक निर्बंध घातले आहेत.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें–२.

स्थापना : १९३५

## – त्रैवार्षिक प्रगतीचे बोलके आंकडे –

| | | १९६० | १९६१ | १९६२ |
|---|---|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३१,८५,८०० | ३९,६५,३०० | ४९,७४,९०० |
| रिझर्व्हज् | रु. | १७,१०,००० | २२,००,००० | २६,८०,००० |
| ठेवी | रु. | १५,१३,५६,००० | १९,४८,३३,००० | २४,७६,६७,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १५,६२,५२,००० | २०,०९,९८,००० | २५,५३,२२,००० |
| शाखा : | | ५२ | ७९ | ७९ |

गेलीं कित्येक वर्षें बँकेचे भागीदारांना करपात्र नऊ टक्के नफा मिळाला आहे.

—: संचालक मंडळ :—

श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम, एफ. आय. बी. (लंडन), अध्यक्ष, मुंबई.
श्री. भा. म. गुप्ते एम. ए., एलएल बी., उपाध्यक्ष, पुणें.
श्री. धों. कृ. साठे, बी. ए., बी. एससी., व्यापारी, पुणें.
श्री. मा. वी. शहा, व्यापारी, सोलापूर,
रावबहादूर म. बा. जांभेकर, इंजीनिअर, लोणावळे.
श्री. शं. ल. किर्लोस्कर, उद्योगपति, पुणें.
श्री. म. स. पारखे, बी. ए., उद्योगपति, पुणें.
श्री. ज. के. रेगे, उद्योगपति, मुंबई.
श्री. वि. सी. शिरगांवकर, उद्योगपति, उगार.
श्री. र. भि. बांठिया, व्यापारी, पनवेल.
श्री व्ही. आर. डफळे, राजा ऑफ जत, लोकसभा सदस्य.

जानेवारी, १९६३ मध्यें बँकेची ८० वी शाखा हडपसर औद्योगिक वसाहतींत स्वतःचे इमारतींत सुरू झाली आहे व लवकरच बँकेच्या पणजी व मडगांव गोवा येथें शाखा सुरू होत आहेत..

चिं. वि. जोग,
बी. कॉम, एफ. आय. बी. (लंडन).
जनरल मॅनेजर.

## लोकशाही व नियंत्रणें

लोककल्याणाचें साध्य सिद्ध करण्याकरिता लोकशाही जेव्हां सामाजिक व आर्थिक व्यवहारांचें नियंत्रण कायद्यानें करूं लागते, तेव्हां लोकशाहीला व्यक्ति-स्वातंत्र्य व समाजहित यांचा समन्वय करण्याची जबाबदारी स्वीकारणें आवश्यक होतें. आणि त्या संदर्भात जेव्हां जेव्हां लोकशाहीनें मान्य केलेले कायदे, अनेक प्रकारचीं नियंत्रणें निर्माण करतात, तेव्हां तेव्हां नागरिकांना घटनेनें दिलेले मूलभूत हक्क नष्टप्राय होत आहेत कीं काय याचा विचार नेहमीच निर्माण होतो. घटनेनें सर्व नागरिकांचें व्यक्ति-स्वातंत्र्य, विचार-स्वातंत्र्य, संघटना-स्वातंत्र्य, वित्त-स्वातंत्र्य, अशा अनेक प्रकारच्या स्वातंत्र्यांचें संरक्षण करण्याची प्रतिज्ञा केली आहे. आर्थिक क्रांति लोकशाहीच्या मार्गानें घडवून आणावयाची असल्यास आर्थिक व्यवहारांमध्यें लोकशाहीला हस्तक्षेप करणें आवश्यक ठरतें.

पूर्वीच्या काळांत शासनसंस्थेचें कार्य मर्यादित स्वरूपाचें मानलें जाई. देशामध्यें शांतता पाळणें व कोठल्याहि प्रकारचा दंगाधोपा होऊं न देणें एवढीच आपली जबाबदारी आहे, असें शासनसंस्था मानीत असे. पण कम्युनिझम किंवा फॅसिझम या दोन तत्त्वांचा फार प्रबळ असा प्रचार युरोपमध्यें झाल्यानंतर लोकशाहीला असें कळून चुकलें कीं, व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली लोकशाहीची परंपरा जर टिकवावयाची असेल तर लोककल्याण हें उद्दिष्ट सत्वर सिद्ध करणें अवश्य आहे. गरिबांचें दारिद्र्य, अज्ञानी लोकांचें अज्ञान, रुग्णांचें आजारीपण, बेकारांची बेकारी, व सामान्यत: सुस्थितींत नसलेल्या लोकांना भोगावे लागणारे क्लेश व आपत्ति यांचें निराकरण जर लोकशाही सत्वर करूं शकली नाहीं, तर कम्युनिझम वा फॅसिझम हे मार्ग कां स्वीकारू नयेत, असा सामान्य जनतेला मोह पडण्याचा संभव असतो. अर्थात् ही गोष्ट खरी आहे, कीं कम्युनिझम किंवा फॅसिझम या राजवटींमध्यें व्यक्ति-स्वातंत्र्याला महत्त्व असत नाहीं आणि हुकुमशाहीमुळें अनेक आर्थिक स्वरूपाचे कार्यक्रम विनाविरोध पार पाडतां येतात. पण आपण ही गोष्ट विसरतां कामा नये. कीं आर्थिक व सामाजिक समता हीं ध्येयें जर लोकशाही सिद्ध करूं शकणार नसेल तर लोकशाहीवरील सामान्य जनतेचा विश्वास ढळण्याची भीति असते. व्यक्ति-स्वातंत्र्याचें महत्त्व कितीहि मोठें असलें, तरी व्यक्ति-स्वातंत्र्यामुळेंच जर सामान्य जनतेची आर्थिक प्रगति होणें टळणार किंवा विलंबणार असेल, तर सामान्य जनता व्यक्ति-स्वातंत्र्याचें महत्त्व मानणार नाहीं; आणि हें सत्य ओळखूनच सामाजिक न्याय ही क्रांतिकारक कल्पना जन्मास आली. लोकशाही सामाजिक न्याय प्रस्थापित करूं शकते असा सिद्धांत लोकशाहीवर निष्ठा बाळगणारें अनेक तत्त्ववेत्ते गेल्या पंचवीस-तीस वर्षांमध्यें आवेशानें प्रतिपादीत आहेत; आणि ह्या नवीन धोरणामध्येंच नियंत्रणाचें बीज आहे.

निरनिराळ्या आर्थिक व्यवहारांत हस्तक्षेप केल्याशिवाय समाजाच्या आर्थिक घटनांमध्यें व समाजाच्या आर्थिक संघटनेमध्यें क्रांति घडवून आणणें शक्य नाहीं, ही गोष्ट पटल्यामुळें लोकशाही प्रसंगोपात्त जरूर ते कायदे पास करीत असते. १९५०सालीं घटना मान्य झाल्यानंतर निरनिराळ्या आर्थिक क्षेत्रांत क्रांति घडवून आणण्याच्या उद्देशानें लोकसभेनें किंवा प्रांतीय विधिमंडळांनीं जे अनेक कायदे पास केले आहेत ते या गोष्टीची साक्ष देतील. जितका कायदा जास्त मूलग्राही व क्रांतिकारक असतो तितका त्याच्याविरुद्ध तीव्र निषेध उत्पन्न होतो. अशा प्रसंगीं लोकशाहीला विवेकवादाचा आश्रय करून व्यक्ति-स्वातंत्र्य व समाजहित या दोन निष्ठांचा समन्वय घडवून आणणें जरूर असतें. एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं, नियंत्रणाशिवाय आर्थिक क्रांति घडवून आणणें शक्य होणार नाहीं. पण नियंत्रणांचा अवलंब करतांना लोकशाहीचा तराजू समतोल राहील अशी खबरदारी घेणें जरूर आहे.

( न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर ह्यांचें व्हीनस प्रकाशन रौप्य-महोत्सवांतील अध्यक्षीय भाषण )

---

## प्रकाशकांच्या व्यवसायाचें सत्यस्वरूप

### श्री. रा. ज. देशमुख ह्यांची स्पष्टोक्ति

ललित व शास्त्रीय प्रकाशन हा धंदा म्हणून मानला जात नसल्यामुळें रिझर्व्ह बँक, सरकार किंवा इतर बँका आम्हांला या धंद्यावर कर्ज देत नाहींत. ( याला अपवाद म्हणजे बँक ऑफ महाराष्ट्राचे अधिकारी आहेत. ते आमचा सहानुभूतिपूर्वक विचार करतात. )

रद्दी विकत घेणारा मारवाडी तेवढा आमची ओळख ठेवतो आणि दरवर्षी "आम्ही आपली रद्दी अमुक भावानें विकत घेऊं" असें न चुकतां पत्रहि पाठवतो.

मारवाड्याला हें पक्कें माहीत असतें, कीं पुस्तक निघून चार वर्षे झालीं कीं त्या पुस्तकाची रद्दी झालीच. प्रकाशक तरी वर्षांनुवर्षे या रद्दीवर गुदामाचा व व्यवस्थेचा खर्च कुठवर करणार ?

मला दाद मागावयाची आहे ती सरकारकडे, विद्वानांकडे, साहित्यिकांकडे व समाजाकडे.

या व्यवसायाकडे जरा आपुलकीच्या नजरेनें पाहा; त्याला व प्रकाशकाला जगवा.

माझी मागणी फार नाहीं.

( १ ) आमच्या प्रकाशन धंद्याचा स्मॉल स्केल इंडस्ट्रीजमध्यें अंतर्भाव करावा.

( २ ) मुद्रकाप्रमाणेंच आम्हांला कागदाचीं लायसेन्स मिळावींत.

( ३ ) रिझर्व्ह बँकेनें स्वत: व इतर बँकांना आमच्या मालावर कर्जें देण्यास परवानगी द्यावी.

( ४ ) सरकार चांगलीं पुस्तकें प्रकाशित करण्यासाठी मदत देतें. वास्तविक ही मदत ग्रंथाच्या गुणावगुणांवर अवलंबून असणें आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षांत मात्र तसें घडत नाहीं. लेखकां-बरोबर प्रकाशकाच्या अर्जाचाहि विचार व्हावा.

( ५ ) ललित पुस्तकें, शास्त्रीय ग्रंथ व संदर्भ ग्रंथ यांचें प्रकाशन हा धंदा नसून आंतबट्ट्याचा व्यवसाय आहे, असें माझें स्पष्ट मत आहे. पण हें मत वाजवी आहे का गैरवाजवी आहे याची निष्पक्षपातीपणें छाननी होणें जरूर आहे असें मला वाटतें. या दृष्टीनें गोखले अर्थशास्त्र संस्थेस प्रकाशकांच्या वतीनें माझी अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या धंद्याची सर्व दृष्टीनें छाननी करून या कूट प्रश्नाचा निवाडा करावा. म्हणजे आम्ही पुस्तकाची ठेवीत असलेली किंमत, लेखकांना देत असलेला मुशाहिरा, या दोनहि गोष्टी योग्य आहेत कीं नाहींत याचाहि निर्णय आपोआपच लागेल. या छाननीसाठी खर्चाची तरतूद होणें आवश्यक असेल तर तो खर्च देण्याची सर्व प्रकाशक खटपट करतील असें मी सर्वांतर्फे आश्वासन देतों.

( ६ ) साहित्यिक, कलावंत यांची ज्याप्रमाणें कदर केली जाते, त्यांना मानधन दिलें जातें, तसें मानधन पोट बांधून आयुष्यभर दारिद्र्यांत राहून मराठी भाषेची व मराठी माणसांची सेवा करणाऱ्या श्री. गणेश महादेव वीरकरांसारख्यांना' सरकारनें द्यावें. त्यांच्या कामाचें चीज करावें. समाजानें स्वत:च्या ऋणांतून उतराई व्हावें.

## कंपनी कायद्याची अंमलबजावणी

### खात्याची उपयुक्त कामगिरी

कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत १९६१–६२ चा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून कंपन्यांच्या कारभारांत सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं कंपनी कायदा खात्यानें केलेल्या कामगिरीची कल्पना येते. भांडवल उभारणी, स्टॉक एक्सचेंज, कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था, ह्यांच्याविषयीं व्यवहार कंपनी कायदा खात्याच्या कक्षेंत येत नाहींत, ही एक मोठी अडचण आहे; तरी सुद्धां असलेले अधिकार वापरण्यांत खात्यानें हयगय केलेली नाहीं. कंपनी कायद्याचें उल्लंघन करणें ही मामुली गोष्ट नसून तो एक गंभीर गुन्हा आहे, ह्याची जाणीव कंपन्यांच्या व्यवस्थापकांना करून देण्यांत खात्यानें यश मिळविलें आहे. त्यामुळें अशा उल्लंघनासाठी भरण्यांत आलेल्या खटल्यांची संख्या १९६०-६१ मध्यें ६,२७२ होती, ती १९६१-६२ मध्यें ३,९६० वर उतरली. खटला भरण्यापेक्षा कंपन्यांवर जादा फी लादण्याचें खात्याचें धोरणहि खटले कमी करण्यास कारणीभूत झालें आहे. गुन्हा शाबीत झाला तरी न्यायालयें आवश्यक तेवढी शिक्षा करीत नाहींत; कायद्यानें सांगितलेल्या कमाल शिक्षेच्या मानानें फारच थोडी शिक्षा करतात; अशी कंपनी कायदा खात्याची तक्रार आहे. सहा वर्षांपूर्वी कंपनी कायदा अमलांत आला, तेव्हांपासून १९६१-६२ अखेर ५,२०० "कागदी कंपन्या" रद्द केल्या गेल्या. कंपन्यांचा वसूल भांडवलांत ८७५ कोटी रुपयांची भर पडली. ३१ मार्च १९६२ रोजीं १८७९ कोटी रु. वसूल भांडवलाच्या २४,७५७ कंपन्या अस्तित्वांत होत्या. त्यांपैकी सरकारी कंपन्यांचें वसूल भांडवल ६२७ कोटी रु. होतें. नव्या कंपन्यांचें बाबतींत मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचा अवलंब आतां फार थोड्या प्रमाणांत केला जातो. गेल्या सहा वर्षांत स्थापन झालेल्या कंपन्यांपैकी फक्त १·२% कंपन्यांची व्यवस्था मॅनेजिंग एजंटांकडे आहे. लिमिटेड कंपन्यांचें आरोग्य सुधारून त्यांतील गैरप्रकार थांबवणें आणि व्यवस्थापनांत सुधारणा घडवून आणणें, हा कंपनी कायदा खात्याचा उद्देश हळूहळू सफल होत आहे.

### नेहरूंच्या आत्मचरित्राचें संस्कृत भाषांतर

पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचें संस्कृत भाषांतर लवकरच प्रसिद्ध होईल. पं. कमलापति मिश्रा हे इंग्रजींतून संस्कृतांत भाषांतर करीत आहेत. ह्या पुस्तकाला पं. नेहरूंनींच हिंदीमध्यें प्रस्तावना लिहिली आहे. भारताच्या १४ प्रमुख भाषांतून हें आत्मचरित्र प्रसिद्ध करण्याची योजना आंखली जात आहे.

### बेळगांव बँकेच्या धारवाड आणि मुधोळ शाखा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें दि बेळगांव बँक लि. ला हुबळी (जिल्हा धारवाड, म्हैसूर राज्य) आणि मुधोळ (जिल्हा विजापूर, म्हैसूर राज्य) ह्या दोन ठिकाणीं शाखा उघडण्यास परवानगी दिली आहे. ह्या शाखा लवकरच उघडल्या जातील.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

अहवालाचे वर्षीं सर्व खर्च भागवून, नोकरवर्गास बोनस देण्यासाठी तरतूद करून, ग्रॅच्युइटी निधीसाठी रु. ५०,००० विश्वस्तांकडे वर्ग करून, राष्ट्रीय संरक्षण निधीला रुपये ५०,००० देऊन आणि प्राप्ति-कराच्या व इतर नित्याच्या व आवश्यक त्या तरतुदी करून बँकेस तिच्या व्यवहारांत नक्त नफा रु. ८,४२,६१२·४५ इतका झाला असल्याचें दिसून येईल. चालू वर्षांच्या नफ्याच्या रकमेंतून गंगाजळीसाठी रू. ४,५०,०००·०० वर्ग केल्यावर रु. ३,९२,६१२·४५ इतकी रक्कम शिल्लक राहते. यांत गेल्या वर्षातून पुढें ओढलेली नफ्याची बाकी रु. ४२,३४९·८० मिळविल्यावर एकूण रु. ४,३४,९६२·२५ इतकी रक्कम वांटण्याकरितां उपलब्ध होते. या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें व्हावी अशी संचालकांची शिफारस आहे.

दिनांक ३१ डिसेंबर, १९६२ ला पूर्ण झालेल्या वर्षासाठी १,००,००० भागांवर वसूल रकमेवर प्रमाणत: द. सा. द. शें. ९ टक्के प्रमाणें करपात्र डिव्हिडंड देण्यासाठी, रु. ३,८८,६००·०० लागतील. रु. ४६,३६२·२५ पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढले जातील.

भाग भांडवलाच्या यंदा रु. १० लाखांच्या काढलेल्या पांचव्या हप्त्याला प्रमाणाबाहेर मागणी आली. यापुढेंहि भाग भांडवलाचा पाया विस्तृत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल विक्रीस काढावें लागणार आहे. त्यासंबंधीं जरूर त्या परवानगीसाठी अर्ज करण्यांत येत आहे.

यंदाचे वर्षीं एकहि नवीन शाखा उघडण्यांत आली नाहीं. परंतु महाराष्ट्रांत व जवळपास अनेक नवीन शाखा उघडण्याबाबत रिझर्व बँकेकडे अर्ज दाखल केले आहेत. पणजी, मडगांव (गोवा), गोरेगांव (मुंबई), उरण व इचलकरंजी ह्या ठिकाणीं शाखा उघडण्याबाबत संमति मिळाली आहे. अहवालाचे वर्षानंतर नुकतीच हडपसर औद्योगिक वसाहतीमध्यें नवीन शाखा सुरू केली आहे.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

वरील बँकेस ३० डिसेंबर, १९६२ अखेर संपलेल्या वर्षीं मागील वर्षातील शिलकी नफा रु. ८९९·४५ धरून, एकूण रु. १,७३,५८५ नफा झाला. रु. ८४,००० रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करून आणि रु. २०,००० ची स्टाफला बोनससाठी तरतूद करून रु. ५९,५८५ उरतात. त्यांतून ९% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी रु. ५८,५०० रु. चा विनियोग केला जाईल आणि रु. १,०८५ पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढले जातील. अहवालाचे वर्षीं बँकेचे चेअरमन आणि एक संस्थापक–डायरेक्टर श्री. एस. एच. साठे हे मृत्यु पावले. त्यांच्या कार्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख डायरेक्टरांच्या अहवालांत करण्यांत आला आहे. बँकेचें मागविलेलें पण अद्याप वसूल व्हावयाचें भांडवल जमा झालें म्हणजे वसूल भांडवलाची रक्कम १३,००,००० रु. होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे ह्यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.